**सुजाता रसाळ**



सुजाता सोलापूर शहरातील एका कामगार वसाहतीतील भागात आपल्या परिवारासह राहते. सुजाताच्या परिवारात एक मुलगा एक मुलगी आहे. सुजाता विधवा आहेत. कोरोंना काळात पतीचे निधन झाल्याने कुटुंब चालविण्याची जबाबदारी सुजातावर आली. सुजाता कुटुंब चालविण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी काम शोधत होती. काही वेळा काम मिळत नाही काही वेळा कमी कलावधीसाठीची कामे करावी लागे. कोरोंना कालावधीत सुजाताच्या हाताला काम नव्हते तिला नेहमी वाटत होत की माझ्याकडे एखादे कौशल्य असते तर मी उदरनिर्वाहाचे साधन म्हणून त्याचा वापर करू शकले असते. स्वावलंबी कुटुंब व्हावे म्हणून ती सतत प्रयत्न करीत असते. मुलाचे शिक्षण आणि घर चालविण्यासाठी हातभार लागावा म्हणून सुजाता सतत काहींना काही काम मिळविण्याचा प्रयत्न करीत असते. पतीच्या निधनानंतर घर चालणे अशक्य होते. लॉकडाउन उठल्यानंतर शाळा सुरू होताच सुजाताने शाळेजवळ खाऊचे दुकान सुरू केले परंतु त्यातून दैनंदिन गरजाच फक्त पूर्ण होत होत्या. .

सुजाताला कोरोंना काळात वाटत होते जर, आपल्याला गाडी चालविता येत असती तर आपणही काहीतरी काम करू शकलो असतो. गाडी चालवता येत नसल्याने या कामाबाबत सुजाता विचार करू शकत नव्हती.

सुजाताला वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्या माध्यमातून ड्रायव्हिंग प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती मिळाली. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्या सहकार्याने शिवधन ड्रायव्हिंग स्कूलमध्ये जगदेवीने रिक्षा चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले. लर्निंग व पक्के लायसन्स घेऊन आपल्या रिक्षा चालविण्याच्या कामाला सुरुवात केली.

सुजाता सांगते, "भाड्याची रिक्षा घेऊन जेव्हा पहिले भाडे माझ्या हातात आले तेव्हा खूप आनंद झाला, डोळ्यात पाणी आले आणि वाटले स्वत:च्या सक्षमीकरणा सोबतच कुटुंबाचे सक्षमीकरण मला करता येईल. शासकीय योजनेतून स्वत:ची ई-रिक्षा घेण्याच्या तयारीत आहे. अधून मधीन भाडे तत्वावर रिक्षा चालवते. माझ्या रोजगारात भर पडून माझ्या कुटुंबाला मदत होत आहे. हे सर्व वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशनच्यामाध्यमातून राबविलेल्या या ड्रायव्हिंग प्रशिक्षणामुळे प्राप्त करता आले. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व सारथी युथ फौंडेशन आपले खूप खूप आभार!"





DRIVE WITH PRIDE
युथ फौंडेशन, सोलापूर.
आणि
वात्सल्य ट्रस्ट मुंबई
यांच्या संयुक्त विद्यमाने
चालक प्रशिक्षण
SARATHI YOUTH FOUNDATION